महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ६६ वे दिनांक : २६/०२/२०२६ वार : गुरूवार

## मनोज जरांगे पाटील यांचा उपोषणाचा इशारा



**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या संदर्भात सरकारने लवकरात लवकर कार्यवाही केली नाही, तर जून महिन्यात पुन्हा उपोषणाला बसण्याचा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द झाले किंवा त्यांना आरक्षणाचा लाभ मिळाला नाही, तर कोणाच्याही विनंतीकडे लक्ष दिले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भात संबंधित मंत्र्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घ्यावे, असेही त्यांनी म्हटले. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारने ठोस निर्णय घेणे आवश्यक असून, नव्या समितीच्या माध्यमातून प्रक्रिया वेगाने पूर्ण होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मराठा आरक्षणाच्या संदर्भात हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेसाठी राज्य सरकारने अखेर नवी समिती स्थापन केली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या देखरेखीखाली ही समिती काम करणार असून प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेली संपूर्ण कार्यपद्धती निश्चित करण्याची जबाबदारी या समितीकडे देण्यात आली आहे.

मराठा आंदोलनादरम्यान आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करून प्रमाणपत्र देण्याची मागणी केली होती. त्यानंतर राज्य सरकारने ही प्रक्रिया सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, सहा महिन्यांचा कालावधी उलटूनही यासाठी स्पष्ट नियम आणि प्रक्रिया निश्चित करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे आता ही समिती स्थापन करून प्रमाणपत्र वितरणाचा मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला आहे.

नवीन समिती प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेले निकष, आवश्यक कागदपत्रे, तसेच पडताळणीची प्रक्रिया निश्चित करणार आहे. या समितीचा अहवाल राज्य सरकारकडे सादर केला जाईल आणि त्यानंतर सरकार त्याला मंजुरी देईल. मंजुरी मिळाल्यानंतर मराठा समाजातील पात्र व्यक्तींना ओबीसी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू होण्याची शक्यता आहे. मराठा आंदोलनाच्या काळात सरकारने ही प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणा आणि नियम निश्चित करण्यात विलंब झाला. त्यामुळे समाजात नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

या निर्णयावर प्रतिक्रिया देताना आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. जर सरकारला प्रमाणपत्र द्यायचेच होते, तर ही प्रक्रिया आधीच सुरू करायला हवी होती. इतके दिवस समाजाला प्रतीक्षा करायला लावण्याचे कारण काय, असा सवाल त्यांनी केला. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि प्रवेशाचा प्रश्न या प्रमाणपत्राशी जोडलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या मनाने शासन निर्णय काढला असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्याला पाठिंबा दिला आहे. मग अंमलबजावणीत अडथळे का येत आहेत, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता वेळेत करावी, अशी मागणी त्यांनी केली.

जरांगे पाटील यांनी कुणबी प्रमाणपत्र आणि त्याच्या वैधतेबाबतही गंभीर मुद्दा उपस्थित केला. अनेकांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहे, मात्र त्याची वैधता प्रमाणपत्र दिली जात नाही, अशी तक्रार त्यांनी केली. मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर समाजाने विश्वास ठेवला आहे. त्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार मराठवाड्यातील मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळायला हवा. स्थानिक चौकशी अहवालानुसार पात्रता सिद्ध झाली असेल, तर प्रमाणपत्र देण्यात अडचण का येते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. समाजाने सरकारवर विश्वास ठेवला आहे, त्यामुळे सरकारनेही त्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना त्यांनी सरकारवर गंभीर आरोप करत गरीब मराठा समाजाच्या भवितव्याशी खेळ केला जात असल्याचे म्हटले. प्रमाणपत्राच्या अभावी अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि प्रवेश धोक्यात येऊ शकतात. जून महिन्यापासून शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया सुरू होते. जर त्यावेळी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले नाही, तर त्यांचे मोठे नुकसान होईल. त्यामुळे सरकारने तात्काळ निर्णय घेऊन प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी त्यांनी केली. मराठा समाजाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही, असेही त्यांनी नमूद केले.

## धनंजय मुंडे यांची आमदारकी धोक्यात? ६ मार्चला सुनावणी





**छत्रपती संभाजीनगर :** औरंगाबाद खंडपीठात सुरू असलेल्या सुनावणीत धनंजय मुंडे यांची आमदारकी १०० टक्के रद्द होणार, असा खळबळजनक दावा करुणा मुंडे यांनी केला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ६ मार्च रोजी होणार असून, न्यायालयाने पुरावे सादर करण्याचे आदेश दिल्याची माहितीही करुणा मुंडे यांनी दिली. खंडपीठात सुनावणी पार पडल्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.

करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध दोन ठिकाणी कायदेशीर लढा पुकारला आहे. त्या म्हणाल्या, "आमची अर्धी केस पूर्ण झाली असून, पुढील तारखेपासून मुख्य सुनावणीला सुरुवात होईल. उच्च न्यायालयाने आम्हाला सर्व पुरावे सादर करण्यास सांगितले आहे. दुसरीकडे, परळीत आमचा अर्ज फेटाळला गेल्यानंतर आम्ही अंबाजोगाई न्यायालयात अपील केले आहे. तेथेही न्यायालयाने धनंजय मुंडे यांना नोटीस बजावली आहे. दोन्ही ठिकाणी आम्हाला यश मिळेल, याची मला खात्री आहे."

परळीच्या तहसीलदारांना २० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आल्याच्या घटनेचा संदर्भ देत करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले. "२० हजार रुपयांसाठी एक तहसीलदार तुरुंगात जाऊ शकतो, तर माझा निवडणूक अर्ज अवैध ठरवण्यासाठी धनंजय मुंडेंनी त्यांना किती मोठी रक्कम दिली असेल, हे आता न्यायालयाच्या माध्यमातून जनतेसमोर येईल," असे त्या म्हणाल्या.

पण आमदारकीच जाणारधनंजय मुंडे पुन्हा मंत्री होण्याची स्वप्ने पाहत आहेत, मात्र आता त्यांची आमदारकीच रद्द होईल, असे करुणा मुंडे यांनी नमूद केले. आमदारकी रद्द करण्यासाठी आम्ही सर्व ताकदीनिशी प्रयत्न करत असून, कायद्याच्या लढाईत आमचाच विजय होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या दाव्यांमुळे बीड जिल्ह्यासह राज्याच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे.

पुणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या भिगवण येथील कथित अपहरण प्रकरणाला आता एक नवे आणि अनपेक्षित वळण मिळाले आहे. संबंधित तरुणीने आपला पूर्वीचा जबाब बदलला असून, आता आपण आई आणि मामासोबत राहण्यास इच्छुक असल्याचे इंदापूर अतिरिक्त सत्र न्यायालयात सांगितले आहे. यापूर्वी बारामती न्यायालयात तिने तरुणासोबतच राहण्याचा हेका धरला होता, मात्र पाच दिवसांच्या कालावधीनंतर तिने आपला निर्णय बदलला आहे

## मुंबई महानगर पालिकेचा ८०,९५२ कोटींचा अर्थसंकल्प; विकासासाठी ३६ हजार कोटींच्या ठेवी मोडणार, ८.७७% वाढ

**मुंबई :** महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी आज सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ८०९५२.५६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांना सादर केला. ज्यात ८९.८४ कोटी रुपयांची शिल्लक रक्कम दाखवण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या ७४४२७.४१ कोटी रुपयांच्या तुलनेत यंदाच्या अर्थसंकल्पात ८.७७ टक्क्यांची भरीव वाढ झाली असून, यामध्ये विकासकामांवर विशेष लक्ष केंद्रित करतानाच प्रशासकीय खर्चात कपात करण्याचे धोरण अवलंबण्यात आले आहे. दरम्यान, विकासकामांसाठी निधी उभारण्याच्या उद्देशाने महापालिका आपल्या काही मुदत ठेवी मोडण्याच्या तयारीत असल्याची मोठी माहितीही या अर्थसंकल्पातून समोर आली आहे.

मुंबई महापालिकेकडे सध्या एकूण ८९४४९.३२ कोटी रुपयांच्या ठेवी असून, त्यापैकी ४४८२६.२३ कोटी रुपये हे 'राखीव' स्वरूपातील असल्याने त्यांना महापालिका स्पर्श करू शकत नाही. मात्र उर्वरित ३६६२३.०९ कोटी रुपयांच्या ठेवींचा वापर आगामी काळातील विविध विकास प्रकल्पांसाठी पूर्णत्वास नेण्यासाठी केला जाईल, असे अर्थसंकल्पात स्पष्ट करण्यात आले आहे.

मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक सुरक्षिततेला प्राधान्य देत जाहिरात फलकांबाबत अत्यंत कठोर नियमावली जाहीर केली आहे. नव्या नियमांनुसार, आता ४० बाय ४० फुटांपेक्षा मोठ्या आकाराचे जाहिरात फलक लावण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली असून, पदपथ आणि इमारतींच्या गच्चीवरही असे फलक लावण्यास मनाई करण्यात आली आहे. यापुढे अशा प्रकारच्या जाहिरातींसाठी कोणतीही नवीन परवानगी दिली जाणार नाही, ज्यामुळे अनधिकृत आणि धोकादायक फलकांना आळा बसून शहरात होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळता येतील.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २६ फेब्रुवारी २०२६

## सकस धान्य निर्मितीसाठी माती परीक्षण आवश्यक - डॉ सतीश गावित



**उमरगा (मुरुम, प्रा. सुधीर पंचगल्ले)** : 'माती परीक्षण ही काळाची गरज असून शेतकऱ्यांना खर्च कमी करून उत्पादन वाढविण्यासाठी फायद्याचे आहे. यातून योग्य खताचा वापर करून सकस धान्य निर्मितीस चालना मिळेल.' असे प्रतिपादन डॉ सतीश गावित यांनी केले. ते श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या व्हांतळ येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरातील दिनांक २४ फेब्रुवारी रोजी बौद्धिक सत्राच्या अध्यक्षीय समारोपात बोलत होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून भूगोल विभाग प्रमुख डॉ धनराज इटले उपस्थित होते. त्यांनी माती परिक्षणासाठी मातीचा नमुना आणण्याची पद्धत सांगून शेतकऱ्यांना मोफत परिक्षणासाठी माती आणण्याचे आव्हान केले. यावेळी डॉ सूर्यकांत राठोड यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वंयसेवक सुशील सूर्यवंशी याने तर आभार अर्जुन जाधव याने मानले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ बी ए शेळके, डॉ अनिल देशमुख, डॉ चंद्रसेन करे, डॉ समाधान पसरकळले, डॉ विठ्ठल ढोले, डॉ अतुल बिराजदार, शिबिरार्थी स्वयंसेवक, शेतकरी ग्रामस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मृताच्या नावे गुन्हा अन् नवरदेवाच्या हाती बेड्या; बोरी दंगल प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर

**जिंतूर (बी.डी.रामपूरकर)** : एकीकडे लग्नाची लगबग आणि दुसरीकडे कारागृहातील बंदिवास, अशा कात्रीत सापडलेल्या स्वप्नील संजय शिंपले या तरुणाला परभणी सत्र न्यायालयाने मोठा दिलासा दिला असून त्याची जामिनावर सुटका करण्याचे आदेश दिले आहेत. दि. १९ फेब्रुवारीला रात्री ११ च्या सुमारास बोरी येथे पुतळा प्रतिष्ठापनेप्रसंगी दंगल झाल्याचे नमूद करत पोलिसांनी दि. 20 फेब्रुवारी रोजी ४६ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (BNS) तब्बल १३ कलमांखाली बोरी पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदवला होता. यात १०९, ११८(१), ११८(२), १३२, ४९, ६१(२), ११५(२), १८९(२), १८९(४), १९०, १९१(३), १२५(ब) आणि १२१(२) यांसारख्या कलमांचा समावेश होता. सरकारी कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला करण्यापासून ते दंगल घडवण्यासाठी गुन्हेगारी कट रचण्यापर्यंतचे गंभीर आरोप लावून पोलिसांनी आरोपींची नाकेबंदी केली होती आणि संशयित म्हणून स्वप्नील शिंपले या तरुणास 20 फेब्रुवारीला दुपारी अटक करून त्याच दिवशी त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत झाली होती.त्यानंतर त्याने ॲड. सुनिल बुधवंत यांच्या मार्फत जमानतीसाठी परभणी येथील मा. जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. न्यायालयात अटक आरोपीची बाजू मांडताना ॲड. सुनिल बुधवंत यांनी पोलिसांच्या या १३ कलमांच्या डोंगरातील हवा एकाच युक्तिवादाने काढून घेतली. त्यांनी न्यायालयासमोर धक्कादायक पुरावा सादर केला की, पोलिसांनी एफ.आय.आर. मध्ये ज्या आरोपी क्रमांक ४२ (लक्ष्मण माटे) याच्यावर दंगलीचे आणि हल्याचे कलम लावले आहे, त्या व्यक्तीचे निधन १४ नोव्हेंबर २०१५ रोजीच झाले आहे. "जो माणूस १० वर्षांपूर्वीच हे जग सोडून गेला, तो दंगल करायला आणि पोलिसांवर हल्ला करायला प्रत्यक्ष हजर कसा असू शकतो?" असा मुद्दा मांडत त्यांनी या प्रकरणात दाखल एफ.आय.आर. मध्ये आरोपींची नावे ही यांत्रिकी आणि मनमानी पद्धतीने गोवल्याचे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच स्वप्नील शिंपले या तरुणाचा विवाह ५ मार्च २०२६ रोजी होणार असून लग्न घटिका जवळ असताना, पोलिसांनी कोणत्याही ठोस पुराव्याविना केवळ संशयावरून स्वप्नीलला अटक केली असून, "ज्या तपासात पोलिसांना जिवंत आणि मृत व्यक्तीमधील फरक कळत नाही, त्या तपासाच्या आधारे एका नवरदेवाला तुरुंगात डांबणे हा त्याच्यावर आणि त्याच्या कुटुंबावर होत असलेला मोठा सामाजिक अन्याय आहे" असा मुद्दा अत्यंत संवेदनशीलपणे न्यायालयाला पटवून दिला. या प्रकरणात सरकारी वकिलांनी सुद्धा युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि पोलिसांच्या एफ.आय.आर. मधील विसंगती पाहता, परभणी सत्र न्यायालयाने २४ फेब्रुवारी रोजी स्वप्नील शिंपले याला जामीन मंजूर केला.अॅड. सुनिल बुधवंत यांना या प्रकरणात अॅड. भगवान घुगे, अॅड. महेश वाघमारे यांनी सहकार्य केले.

## मराठवाडा मूर्तीने समृद्ध परिपूर्ण असणारा भूप्रदेश - डॉ. माया पाटील





**छत्रपती संभाजीनगर** : मराठवाड्यामध्ये वेगवेगळ्या राजवटींनी मोठ्या प्रमाणावर आपले साम्राज्य निर्माण केले होते. त्यावेळी मंदिराची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर झाली त्याचबरोबर मूर्तीचाही मोठा विकास मराठवाड्यांमधून झाल्यामुळे मराठवाड्यातूनच मूर्तीचा समृद्ध परंपरा असणारा प्रदेश विकसित झाला असे प्रतिपादन डॉ. माया पाटील यांनी केले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभागामार्फत दि. २५ व २६ फेब्रुवारी २०२० रोजी भारतीय मूर्तीशास्त्र या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये डॉ.माया पाटील यांनी मराठवाड्यातील समृद्ध असणाऱ्या राजवटींचा उल्लेख करून त्यांनी मंदिर स्थापत्यसाठी व मूर्ती घडवण्यासाठी जे योगदान दिले आहे त्याचा ओळख स्लाईटच्या माध्यमातून करून त्यांनी मूर्तिशास्त्र मूर्तीची उपासना, हिंदू मूर्तीशास्त्र उदय,विकास व त्याची वाटचाल याविषयी सविस्तर अशी मांडणी त्यांनी केली.त्यामध्ये त्यांनी मूर्तीचे विविध अंग, निर्गुण उपासना, सगुण उपासना, यज्ञ,लक्षण ग्रंथ,मूर्तीची प्राचीनता, वेगवेगळ्या मूर्तीचे आयुधे, वाहन याचा संगोपन माहिती स्लाईडच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुपारच्या दुसऱ्या सत्रा मध्ये डॉ. श्रीकांत गणवीर यांनी मूर्तीचे महत्त्व, मूर्ती आणि प्रतिमा यांच्यातील फरक, ग्रंथिक लक्षणे आणि मूर्ती, मूर्तीच्या प्राचीनतेचे महत्व, अंतरविद्याशाखीय मूर्तीचा अभ्यास हे सर्व स्लाईडच्या माध्यमातून दाखवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये प्रा. ओशीन बंब यांनी मूर्ती शास्त्रातील मुद्रा आसन आणि वाहन या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी मुद्रा,आसन आणि वाहन हे मूर्तीशास्त्राचे अ ब क ड आहेत असे प्रतिपादन केले.त्याच बरोबर मूर्तीच्या सोबत असणाऱ्या प्रतीकांचा जो गहन अर्थ आहे ते उदाहरणासह स्पष्टीकरण दिले. विद्यार्थ्यांनी जे जे विचारलेले प्रश्न व त्यांच्या शंका, निरासन करण्याचे काम डॉ. माया पाटील, डॉ. श्रीकांत गणवीर व प्रा. ओशिन बंब यांनी केले. या भारतीय मूर्तीशास्त्र कार्यशाळेची प्रस्ताविक भूमिका संयोजिका डॉ. पुष्पा गायकवाड यांनी मांडली तसेच या कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप डॉ. गीतांजली बोराडे यांनी केला. या कार्यशाळेचे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कामाजी डक यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.सोनाली मस्के यांनी करून दिला तर आभार प्रदर्शन डॉ. राहुल बचाटे यांनी केला.ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ.बिना सेगर, डॉ. संजय पाईकराव, डॉ.महेश सरोदे, डॉ. रवी गवांदे, प्रा. प्रियदर्शन हटकर, प्रा. जोगदंड आश्विन डॉ. कुमार भवर आदींनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेसाठी संशोधक विद्यार्थी शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फतियाबाद येथे दुचाकी - ट्रॅक्टर अपघात; एक जखमी



**दौलताबाद (जावेद अहमद)** : धुळे-सोलापूर महामार्गावरील जांभाळा गावाजवळ मंगळवारी (दि. २४) दुपारी १:३० वाजेच्या सुमारास दुचाकी घसरून झालेल्या अपघातात आई व मुलगा गंभीर जखमी झाले. शैलेश लक्ष्मण गायकवाड (वय २१) आणि रुक्मिणी लक्ष्मण गायकवाड (वय ३९, रा. माळीवाडा) अशी जखमींची नावे आहेत.शैलेश आपल्या आईला घेऊन दुचाकीवरून (एम.एच.२०, बी.डब्लू. ६१३९) वेजापूर येथीलनातेवाईकाचा दहाव्याचा कार्यक्रम आटोपून घराकडे येत होता. जांभाळा गावाजवळ अचानक त्यांची दुचाकी घसरल्याने हा अपघात घडला. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी मदतीसाठी धाव घेतली. जखमींना जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या रुग्णवाहिकेतून छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचारासाठी तातडीने दाखल करण्यात आले आहे. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २६ फेब्रुवारी २०२६



## माय मराठीचा गौरव महोत्सावात बापुराव वऱ्हाडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**कन्नड (अरुण थोरात) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या दि. २४ फेब्रुवारी रोजी सुरु झालेल्या "माय मराठीचा गौरव" या महोत्सवाच्या पहिल्या दिवशीच्या उद्घाटन समारंभात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून बापुराव वऱ्हाडे यांच्या 'शोध' कादंबरीची मीमांसा या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजितप्राचार्य, नरहर कुरुंदकर व्याख्यानमाला या माय मराठीचा गौरव महोत्सावामध्ये उद्घाटन समारंभात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध लेखक व तज्ज्ञ पक्षी निरीक्षक माणिक पुरी यांच्या हस्ते व छत्रपती संभाजीगरचे अपर आयुक्त कार्यालयाचे के.के.भधाने (तहसीलदार), नायब तहसीलदार श्री धावणे, मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. दासू वैद्य व विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे या मान्यवरांच्या उपस्थितीत बापुराव वऱ्हाडे यांच्या 'शोध' कादंबरीची मीमांसा या संदर्भ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. प्रस्तुत कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. दासू वैद्य यांनी केले. सूत्रसंचलन केशरचंद राठोड यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार मीरा गायके यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमासाठी मराठी विभागातील विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, अभ्यासक, मान्यवर आणि मराठी भाषेवर प्रेम करणारे सर्व रसिक श्रोते उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत बापुराव वऱ्हाडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्याबद्दल त्यांचे मराठी विभागाच्यावतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

## महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सफाई कर्मचाऱ्याचा विजेचा शॉक लागून मृत्यू





महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष

Reg No.: SEC/UPP/MAR 2023/08

राहुल जी. वडमारे

जिल्हाध्यक्ष

मा. संजय (शिवा) सोनवणे

कार्यालय - 8-26-203, भिमराज नगर, हिमायतबाग, उध्दवराव पाटील शाळेच्या मागे, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

9373459886, wadmarerahul17@gmail.com

दिनांक: २४/०२/२०२६

प्रति,
मा. आयुक्त साहेब,
महानगरपालिका,
छत्रपती संभाजीनगर.


विषय : दि. २१ फेब्रुवारी रोजी महानगपालिका धनकचरा विभागातील सफाई कर्मचारी श्री. आमोल दिनकर जाधव यांचे कर्तव्य बजावत असतांना विजेचा शॉक लागुन जागीच मृत्यू झाला व सहकारी सफाई कर्मचारी रविंद्र रिडलॉन हा गंभीर जखमी झाला असून उपचार चालु आहे. या सर्व घटनेंचे सर्वस्व जबाबदार महानगरपालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा अतिक्रमण विभाग नियंत्रण अधिकारी संतोष वाव्हुळे, सहाय्यक आयुक्त प्रसाद विद्याधर देशपांडे व धनकचरा व्यावस्थापन कक्ष प्रमुख नंदकिशोर भोंबे हे तिघे आहेत. त्यामुळे या तिघांवर सदोष मनुस्थवदाणाचा गुन्हा दाखल करणे बाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरून महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आपणास तक्रार करण्यात येते की, शासकिय नियमा नुसार महानगरपालिकेच्या कर्तव्यावर असतांना सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षा संघ (Sefti Kit) व त्याच्या जिवितास कोणतीही हानी होऊ नये याची सर्व काळजी घेणे हे काम या वरील तीन्ही अधिकाऱ्यांचे आहे. यात तिळ मात्र शंका नाही. आजपर्यंत यांनी या कोणत्या बाबतीकडे लक्ष दिले नाही. कारण यांना भ्रष्टाचार करून करोडे रूपये लपवण्यासाठीत वेळ पुरत नाही.

या अधि ही आशा प्रकारच्या आनेक घटना घडल्या आसुन मरण पावलेल्या ...च्या कुटुंबाला त्याच्याच हक्काच्या पगारीतून कापलेल्या विम्याच्या पैशाची मदत ... द्यायची आणि जनतेसमोर मोठेपणा दाखवायचा आणि प्रकरण दाबण्याचा

25/02/2026



प्रयत्न करायचा असा जिव घेणा प्रकार कधी पर्यंत चालणार आणि आणखी किती निष्पाप जिव तुम्ही घेणार आहे. आसा प्रश्न या छत्रपती संभाजीनगरच्या जनतेला पडला आहे.

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष हा मा. न्यायालयाच्या व महानगरपालिकेच्या नियमांच्या विरोधात कधीही न्हवता आणि नाही.

अनाधिकृत बॅनर होर्डींग, अतिक्रमन या सर्व गोष्टीवर कार्यवाही व्हायलाच पाहिजे. पण त्या कार्यवाहीमध्ये पारदर्शकता व सर्व समान न्याय असायला पाहिजे. या गोष्टी महानगरपालिकेने कधीच पाळल्या नाही. तरी सर्व अधिकाऱ्यांनी शासकीय नियम पाळले असते तर कदाचित हा निष्पाप जिव गेला नसता.

तरी मे. साहेबांनी छत्रपती संभाजीनगरच्या जनतेची मागणी आहे म्हणून तात्काळ या तिन्ही अधिकाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा व मयतास त्याच्या विम्याचे पैसे न देता महानगरपालिका प्रशासनाकडून २ कोटी रूपये नगद व मयताच्या वारसांना पुर्ण शिक्षण मोफत करावे व नोकरीला लागेपर्यंत त्याची हमी घ्यावी. ही नम्र विनंती. अन्यथा आपल्या कार्यालयासमोर महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतिने लोकशाही मार्गाने तीव्र निदर्शने, आंदोलने करण्यात येतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

जय भिम ! जय संविधान !!

आपला

राहुल जी. वडमारे

प्रत माहिती व कार्यवाहिस्तव सादर

१. मा. विभागीय आयुक्त साहेब
विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर.
२. मा. जिल्हाधिकारी साहेब,
जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या धनकचरा विभागात कार्यरत असलेले सफाई कर्मचारी आमोल दिनकर जाधव हे कर्तव्य बजावत असताना विजेचा शॉक लागून जागीच मृत्यू पावले. या दुर्दैवी घटनेत त्यांचे सहकारी सफाई कर्मचारी रविंद्र रिडलॉन हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.सदर घटना ही महानगरपालिका प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या गंभीर निष्काळजीपणामुळे घडल्याचा आरोप महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी. वडमारे यांनी केला आहे. शासकीय नियमांनुसार सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधने (सेफ्टी किट) देणे बंधनकारक असताना संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे हा जीवघेणा अपघात झाल्याचे त्यांनी सांगितले.या प्रकरणी महानगरपालिकेचे अतिक्रमण विभाग नियंत्रण अधिकारी संतोष वाहूळे,प्रसाद विद्याधर देशपांडे सहाय्यक आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख नंदकिशोर भोंबे संबंधित विभागप्रमुख, जबाबदार अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत २ कोटी रुपये द्यावी व मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरीला लागेपर्यंत मोफत शिक्षण द्यावे आणि नोकरीला लावावे याची जबाबदारी घ्यावी तसेच जखमी कर्मचाऱ्याचा संपूर्ण उपचार खर्च महानगरपालिकेमार्फत करावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.महानगरपालिका प्रशासनाने वेळेत योग्य निर्णय न घेतल्यास महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.ही घटना शहरातील कामगारांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## माय मराठीची गाथा

भाषा अनंत युगाची.
भाषा माझी अभिजात
बोली शैलीने जागली
माय मराठीची ज्योत......१

माय मराठी मराठी,
आहे अमृताची खणी.
'अ'आईच्या स्वरांनी
माझी ओथंबली वाणी.....२

माय मराठी मराठी.
कसा मरदनी बाणा,
बोली शैलीने जागल्या
तिच्या उच्चाराच्या खुणा....३

माय मराठी मराठी
कसं अहेवाचं लेणं,
तिच्या कपाळी गोंदण
अनुस्वाराचं ग देणं....४

माय मराठी मराठी
माय माऊलीची बोली,
युगे अनंत येतील
थांग अथांगाची खोली...५

माय मराठी मराठी.
माय मातीचे रांगणे,
तुझ्या पदरात घे ग
शब्द अक्षरांचे लेणे......६



- **प्रभाकर शेळके,**
**(मो.९९७५१३७३३७)**

## पक्षी अंगणी येता

सुरू झाला उन्हाळा
आटले विहिरी तळे
वृक्षांची पानझड
सुकले हिरवे मळे

व्याकुळले पक्षी
शोधती चारा पाणी
दूर दूर भटकती
ओसाड माळरानी

पक्ष्यांना जीवदान देऊनी
टाळूया पर्यावरणाची हानी
ऐकू येईल सर्वांना
गोड चिव-चिव कानी

अंगणी मोकळ्या जागेत
वाटीत पाणी ठेवूया
तहान त्यांची क्षमवून
माणूसकीला जपूया

पक्षी अंगणी येता
टाकूया तांदळाची कणी
झाडावर उडून जातील
पिऊन गार पाणी



- **रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २६ फेब्रुवारी २०२६


## संत साहित्याच्या केंद्रस्थानी मानवतावाद -डॉ. विजयकुमार फड



**अमरावती :** महानुभाव व वारकरी संप्रदायाच्या साहित्याच्या केंद्रस्थानी मानवतावाद असून मानवाचे कल्याण हा विचारांचा धागा होता. जातीभेद आणि विषमता नाकारणारे हे विचार लोकसमूहासाठी फायद्याचे ठरले असे विचार डॉ. ह. भ. प. डॉ. विजयकुमार फड यांनी मांडले. दगडोजीराव देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'महानुभाव - वारकरी संप्रदाय : वैचारिक अनुबंध आणि वर्तमान' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या वेळी उद्‌घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विजय राऊत हे होते. बीजभाषक डॉ. सतीश बडवे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण चे संचालक डॉ. कैलाश अंभुरे, प्राचार्य डॉ राहुल हजारे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासनाचे समन्वयक महंत डॉ. सोनपेठकर बाबा हे उपस्थित होते.चर्चासत्राच्या द्वितीय सत्रात संत साहित्याची ज्येष्ठ अभ्यासक डॉक्टर सतीश बडवे यांनी महानुभाव वारकरी संप्रदाय वैचारिक अनुबंध आणि वर्तमान या विषयावर आपले विचार मांडले. तेराव्या शतकातील धर्मसंप्रदायाची वांग्मयीन कामगिरी व सांप्रदायिक संत पुरुषाचे कर्तुत्व मौलिक स्वरूपाचे असून लोकभाषेतून साहित्य निर्मिती करण्याची भूमिका महानुभाव वारकरी या दोन्ही संप्रदायाने स्वीकारली आहे त्यामुळे मराठीचा पुरस्कार व जन भाषेतील ग्रंथ निर्मिती व काव्य निर्मिती याबाबत दोन्ही संप्रदायांनी मराठी भाषेला वैभव संपन्न व समृद्ध बनवले असे श्री सतीश बडवे यांनी मत मांडले. विविध क्षेत्रात डॉ.संजय जगताप डॉ कदम ,प्रा.चक्रधर कोठी, डॉ महंत सोनपेठकर, श्री ज्ञानेश्वर बंडगर यांनी विविध विषयावर आपले विचार मांडले चर्चासत्रासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अनेक महाविद्यालयाचे प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. निशिकांत आल्टे, प्राचार्य डॉ सय्यद आसिफ झकेरिया ,उपप्राचार्य डॉ संजय सांभाळकर उपप्राचार्य डॉ.मधुकर चाटसे ,डॉ.सुभाष बागल, डॉ. युवराज धबडगे, डॉ. रेखा वाघ डॉ.मोहन सौंदर्य डॉ.नागेश बोंतेवाड डॉ. अर्शिया कादरी आणि डॉ. अनिल वाघ , प्रा शरद खंदारे, डॉ भाग्यश्री कोष्टी यांनी परिश्रम घेतले






## मुकुंदवाडीत भव्य विज्ञान प्रदर्शन; विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे सादरीकरण, स्कूल बॅग वाटपाने गौरव



**मुकुंदवाडी :** अगस्त इंटरनॅशनल फाउंडेशन यांच्या वतीने भानुदास चव्हाण सभागृह येथे दि. २४-०२-२०२६ रोजी भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथील विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रकल्पांचे सादरीकरण केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. तसेच या प्रदर्शनासाठी श्रीमती मयुरी इंगळे व श्रीमती सुरेखा आक्षे यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करून प्रकल्पांची उत्कृष्ट तयारी करून घेतली. विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध संकल्पनांवर आधारित नाविन्यपूर्ण स्वरूपातील प्रकल्प सादर केले, ज्यामुळे शाळेचे सादरीकरण स्पर्धेत विशेष लक्षवेधी ठरले. सहभागी विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आज दि. २५-०२-२०२६ रोजी अगस्त इंटरनॅशनल फाउंडेशनच्या वतीने मुख्याध्यापक श्री. चौधरी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप करून गौरविण्यात आले.

## बीड जिल्ह्यात लाळखुरकुत रोग निर्मूलनासाठी लसीकरण फेरी ८ ला सुरुवात; पशुपालकांना प्रशासनाचे आवाहन

**बीड (भगवंत पाळवदे) :** लाळखुरकुत रोग प्रतिबंधात्मक लसीकरणाद्वारे सन २०३० पर्यंत निर्मलन करण्याचे लक्षांकित आहे. जिल्ह्यातदिनांक १४.८.२०२५ ते ३१.१०.२०२५ या कालावधीत लाळखुरकृत लसीकरण फेरी ७ पार पडली असून५९५००५ एवढ्या पशुधनाचे लसीकरण करण्यात आले आहे. खात्याच्या मार्गदर्शक सूचना नुसार या पशुधनासदर सहा महिन्यांनी लाळखरकृत रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करणे आवश्यक आहे. त्या अनुशान्गाने जिल्ह्यातलाळखुरकुत रोग प्रतिबंधात्मक लसीकरण फेरी ८ ही राज्यात व जिल्ह्यात दि. १३.०२.२०२६ ते २९.०3.२०२६ याकालावधीत राबविण्यास प्रारंभ झाला असून बीड जिल्ह्याकरिता एकूण ५०५३०० एवढ्या लस मात्रां प्राप्त असूनतालुका स्तरावरून सर्व संस्थाना त्याचा पुरवठा करण्यात आला आहे. सदर लसीकरण मोहिमे मध्ये सर्व पात्र निरोगीपशुधनास लसीकरण करण्यात येणार असून सदर लसीकरण ची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेण्यात येणार आहे.जनावरांच्या कानात बिल्ला असल्याची व संबंधित पशूपालकाच्या मोबाईल क्रमांक वर OTP द्वारे पड़ताळणीकरून NDLM वर real time monitoring करण्यात येणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व पशुपालकांना अहवान करण्यात येते कि लाळखुकृत या जीवघेण्या व आर्थिक नुकसान पोहोचवणाच्या या आजारापासून आपलेबहुमूल्य पशुधनाचा बचाव करणे करिता नजिकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयास संपर्क करून लसिकरण करूनघ्यावे व पशुवैद्यकीय चिकीत्सालायास सहकार्य करावे असे जिल्हा प्रशासनामार्फत आव्हान करण्यात येत आहे.

## प्रा. डॉ. किशोर वाघ यांना 'राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार - २०२६' प्रदान



**परळी :** अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेनिंग व रिसर्च सेंटर (बार्टी) सहाय्यक उपायुक्त आयु. विशाल लोंढे, क्रांतिकारी कीर्तनकार ह-भ-प ज्ञानेश्वर महाराज वाबळे व कार्यक्रमाचे आयोजक पृथ्वीराज शिंदे व सहकारी यांच्या उपस्थितीत प्रा. डॉ. किशोर वाघ यांना "राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार- २०२६" राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात परळी येथील स्व. गोपीनाथराव गोपीनाथराव मुंडे या सभागृहत प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २६ फेब्रुवारी २०२६

# शासकीय आश्रम शाळेतील शालेय व्यवस्थापन समितीचा प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** छत्रपती संभाजीनगर मध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात येणाऱ्या आठ शासकीय आश्रम शाळांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सामाजिक संस्थेच्या अंतर्गत शालेय व्यवस्थापन समितीचा प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.या प्रशिक्षणामध्ये लेखा आणी पोक्सो या विषयाला धरुन मार्गदर्शक विषय तज्ञ प्रकाश वानखेडे यांनी शासकीय आश्रम शाळांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या समितीच्या माध्यमातून शाळा व्यवस्थापन समितीला दरवर्षी एकूण पाच लाख रुपये उपलब्ध करून देण्यात येतो त्याचबरोबर स्वच्छ शौचालय, शौचालयाला नवीन दरवाजे बसविणे तुटलेले जुने दरवाजे दुरुस्ती करणे ,नळांची दुरुस्ती करणे, नादुरुस्त बल्ब, फळे बदलणे,वर्गसजावट करणे,अत्यंत तातडीचा खर्च,विद्यार्थी हिताची इतर महत्त्वाची कामे करणे,संकुल परिसर व खेळाचे मैदान स्वच्छ साफसफाई करणे, पाणीपुरवठा करणे,पाणी फिल्टर खरेदी व दुरुस्ती करणे, प्रथमोपचार व औषधी खरेदी करणे,आरोग्य शिबिर राबविणे,मग,बादल्या, झाडु पुरवठा करणे,एक ते दोन चेंबर्स ची दुरुस्ती करणे, किचन ओट्याची दुरुस्ती करणे, तसेच शालेय कामकाजात पालक आणि समाजाचा सक्रिय सहभाग असावा शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून शाळेतील विविध समस्या शोधणे बैठकांमध्ये चर्चा करून सर्वांमध्ये त्या समस्यांवर उपाय शोधणे आणि लोकसहभागातून शाळेच्या विकासाला गती मिळवून देणे अशा अनेक बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर एकात्मिक आदिवासी विकास विभाग व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभागाकडून इमारतीचे आयुष्यमान वापरण्यास योग्य व सुरक्षित करावयाची कामे आणि विविध सुख-सुविधा व शाळांमधील पायाभूत सुविधा या बाबींवर शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक,समितीचे अध्यक्ष, पालक सदस्य यांनी चांगल्या प्रकारे काम करावीत याबद्दल चर्चा करण्यात आली. त्यानंतर ऍडव्होकेट अंजली यांनी पालक व विद्यार्थ्यांमध्ये संवाद साधून पोक्सो कायद्याबद्दल माहिती सांगितली. लैंगिक अत्याचाराचे प्रकार, लैंगिक समुपदेशनाची गरज याचबरोबर विविध कायद्यांचे मार्गदर्शन केले. शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तिसगाव या शाळेचे मुख्याध्यापक विलासजी कटारे यांनी बिरसा मुंडा,तंट्या भिल, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले,सावित्रीबाई फुले अशा अनेक महान पुरुषांना नमन करून एसएमसी बद्दल व विविध विषयांवर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात मध्यंतरामध्ये सर्व शाळेचे अध्यक्ष पालक सदस्य शिक्षक सदस्य विद्यार्थी प्रतिनिधी सदस्य यांनी रुचकर जेवणाचा आस्वाद घेतला. या प्रशिक्षणामध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक अधिकारी उद्धव वायाळ,सांगळे, कदम,सोनवणे,पिसे शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती अंभोरे व शासकीय आश्रम शाळेचे मुख्याध्यापक विलासजी कटारे, वारे, मुळे,अनिल बावस्कर, सहशिक्षक डीजी खालापुरे,भावसार, राठोड, त्याचबरोबर पालक सदस्य या सर्व शाळेच्या व्यवस्थापन समितींना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सामाजिक संस्थेच्या वतीने सर्वांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन कार्यक्रमाची सांगता केली.

## हाती मोबाईल

हाती मोबाईल! आले नवे यंत्र!
जगण्याचे तंत्र! बिघडले!!

काळजाचे कप्पे! कधीचे रे बंद!
विचार अरुंद! झाले जगी!!

आता ना संवाद! उरलाय वाद!
घालू कोणा साद! समजेना!!

कोणी ऐलतीरी! पैलतीरी कोणी!
गटांगळ्या कोणी! खाई रोज!!

कुठे वळवळ! कुठे सळसळ!
रोज मळमळ! ठरलेली!

आयुष्याच्या रानी! दाटलेय ढग!
जगण्याचे भोग ! वाढलेले !!

धावत्या गाडीची! निघता पाचर !
जगण्याची सर! हरवली!!

काळाला सुतक! विवळती कुत्रे !
सावलीचे चित्रे! पुस्तकात!!

वळणीचे कपडे! ओले सुकलेले!
वाळूनिया गेले! उन्हामध्ये!!



**- ज्ञानेश्वर गायके, कन्नड**







